माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- १९५ /२०१९**

**तक्रारकर्ता श्री. एहतेश्याम कुतुबुद्दीन सिध्दीकी (बंदी)**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी रजिस्टार (R.T.I.& SGRC CELL)**
मुंबई विद्यापीठ, रुम नं.१११, पहिला मजला, फोर्ट,
एम.जी.रोड, मुंबई -४०० ०३२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रभारी कुलसचिव**
मुंबई विद्यापीठ, रुम नं.१११, पहिला मजला, फोर्ट,
एम.जी.रोड, मुंबई -४०० ०३२

**<u>तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : १७.१०.२०२४</u>**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित(व्ही.सी.व्दारे) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

आयोगाने यापूर्वी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००००८४ प्रकरणी आयोगाने दि.०८.०३.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

१) *"जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना ७ दिवसामध्ये माहितीचा अधिकार अधिनियमचे कलम ७(६) अन्वये निशुल्क माहिती पुरवावी.*

२) *१ आठवड्यात माहिती पुरविली नाही तर जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियमाचे कलम २० अंतर्गत कारवाई करण्यात येईल.*

३) *अपील निकाली काढण्यात येत आहे."*

तक्रारकर्ता यांनी दि. २२.०९.२०१६ रोजी मुंबई विद्यापीठाकडे तक्रार विषयी दि. १९.०३.२०१८ रोजी माहिती अर्ज करुन तक्रारीवर केलेली कारवाईची माहिती विचारली. मा. राज्य माहिती आयोगाने दि.०८.०३.२०१९ रोजी माहिती पुरवावी असे आदेशित केले होते.

उक्त आदेशानुषंगाने तक्रारकर्ता यांना अपूर्ण व चुकीची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि.१९.०३.२०१८ रोजी आयोगासमोर तक्रार अर्ज दाखल केला. सदर तक्रारीवर जन माहिती अधिकारी तथा डेप्युटी रजिस्टार (R.T.I.& SGRC CELL) मुंबई विद्यापीठ, मुंबई यांच्याकडून आयोगाने दि.२३.०४.२०१९ च्या पत्रानुसार अहवाल मागविण्यात आला. त्याअनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांनी त्यांचा अहवाल दि. १०.०५.२०१९ आयोगास सादर केला.

..२/-

सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता (व्ही.सी.माध्यमाव्दारे) व जन माहिती अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास निवेदन केले की, आयोगाचे दि. ०८.०३.२०१९ रोजीचे आदेशानुसार तक्रारकर्त्यांना दि. १३.०३.२०१९ रोजीचे पत्रान्वये माहिती देण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास लाला लजपतराय विधी महाविद्यालय, मुंबई यांचे दि. ०७.०३.२०१९ रोजीचे पत्र सादर केले जेथे की, संबंधीत महाविद्यालयाने नमुद केले की, शैक्षणिक वर्ष- २०१५- १६ मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता व वर्ष २०१७- १८ मध्ये उत्तीर्ण झाली होती व त्या उमेदवारांची उपस्थिती विद्यापीठाच्या निकषाप्रमाणे होती. सध्या त्यांच्याकडे उपस्थितीबाबतचे अभिलेख उपलब्ध नाहीत.

तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी दि. २२.०९.२०१६ रोजी केलेली तक्रारची त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये काही उल्लेख नाही. अभिलेखावर उपलब्ध तक्रारकर्ता यांची दि.२२.०९.२०१६ ची तक्रारीची प्रतीवरुन असे निदर्शनास येते की, कारागृहाचे एक अधिकारी यांनी कामावर उपस्थित असताना कारागृहामध्ये महाविद्यालयाचा उपस्थिती रजिस्टर मागून स्वाक्षरी करण्याची शक्यता आहे. म्हणून तक्रारकर्ता यांनी त्यांचे तक्रार अर्जात नमुद केले जेव्हा ते स्वत: कारागृहात आहे तेव्हा त्यांनी तक्रार करुन सदर विषयी कारवाई करण्याची मागणी केली होती. तक्रारकर्ता यांचे म्हणणे की, जेव्हा संबंधीत अधिकारी हे मुंबई मध्यवर्ती कारागृहात उपस्थित होते तेव्हा त्यांनी संबंधीत महाविद्यालयातील तासिकांना (lecture) उपस्थिती कशी दर्शविलेली आहे.

जर लाला लजपतराय विधी महाविद्यालय, मुंबई यांनी असे लिहून दिले की, सर्व उमेदवारांची उपस्थिती विद्यापीठाच्या निकषाप्रमाणे होती. तर प्राचार्य, लाला लजपतराय विधी महाविद्यालय, मुंबई यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगास नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र सादर करावे की, श्री. हर्षद भिमनराव अहीरराव, अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांनी मुंबई विद्यापीठाच्या निकषाप्रमाणे महाविद्यालयामध्ये उपस्थिती दर्ज केली आहे.

जन माहिती अधिकारी, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांनी जरी विषय लाला लजपतराय विधी महाविद्यालय, मुंबई यांच्याशी संबंधीत असल्याने त्यांच्याकडे हस्तांतरीत केला तरी विद्यापीठाचे प्रतिष्ठेसाठी त्यांनी आवश्यक ती काळजी घेतलेली दिसून येत नाही.

तक्रारकर्ता यांनी अपील करुन ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने त्यांनी आयोगाने जो निर्णय दिला तो मान्य असेल असे नमुद केले. सदर प्रकरणी पुढील सुनावणीस तक्रारकर्ता यांची उपस्थिती आवश्यक नाही.

**आदेश**

**सदर प्रकरणी पुढील सुनावणी दि. ०८.११.२०२४ रोजी दुपारी ०२.००० वाजता घेण्यात येईल.**

State Information Commission Greater Mumbai

(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई

**मुंबई**
**दिनांक : २१.१०.२०२४**

**प्रत: लाला लजपतराय विधी महाविद्यालय, मुंबई**

**रामाआ-तक्रार क्र.बीएम- १९५ /२०१९**
**तक्रारकर्ता श्री. एहतेश्याम कुतुबुद्दीन सिध्दीकी (बंदी)**
**सुनावणी दिनांक : ०८.११.२०२४ (In continuation of order dt२१.१०.२०२४)**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. २४.१०.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

सदर प्रकरणी दि. २१.१०.२०२४ रोजी आयोगाने असे आदेशित केले होते की, प्राचार्य, लाला लजपतराय विधी महाविद्यालय, मुंबई यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगास नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र सादर करावे की, श्री. हर्षद भिमनराव अहीरराव, अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह यांनी मुंबई विद्यापीठाच्या निकषाप्रमाणे महाविद्यालयामध्ये उपस्थिती दर्ज केली आहे. तसेच, आयोगाने असेही नमुद केले की, तक्रारकर्ता यांनी अपील करुन ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी झाला असल्याने त्यांनी आयोगाने जो निर्णय दिला तो मान्य असेल असे नमुद केले. सदर प्रकरणी पुढील सुनावणीस तक्रारकर्ता यांची उपस्थिती आवश्यक नाही.

जन माहिती अधिकारी, मुंबई विद्यापीठ व प्राचार्य, लाला लजपतराय महाविद्यालय उपस्थित असून प्राचार्य, लाला लजपतराय महाविद्यालय यांनी नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र आयोगासमोर सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. त्यामध्ये नमुद केले आहे की, Attendance of all students who were admitted in the academic year 2015- 16 and passed out in 2017- 18, including Mr. Harshad Bhimrao Ahirao, was as per Mumbai University Ordinance Number 6086.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) प्राचार्य, लाला लजपतराय विधी महाविद्यालय, मुंबई यांनी आयोगास सादर केलेले नोटराईज्ड प्रतिज्ञापत्राची छायांकित प्रत तक्रारकर्ता यांना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.**

**२) तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

प्रदीप व्यास 8-11-2024

**मुंबई** **(डॉ. प्रदीप व्यास)**
**दिनांक : ०८.११.२०२४** **राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**प्रत: प्राचार्य, लाला लजपतराय विधी महाविद्यालय, मुंबई.**